# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली-४१५ ७१२ जिल्हा रत्नागिरी

## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

जा.क्र.मसंकें/प्रअपां/ लिलाव/१२७/ 827/२०२२ . दिनांक ०९.०३.२०२२

## आंबा फळे विक्रिची निविदा सूचना

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी अंतर्गत असलेल्या पांगारी, वाकवली येथील सन २०२२ या हंगामातील हापूस व इतर जातिच्या बागेतील आंबा फळ झाडे (प्रायोगिक झाडे वगळून) मोहोरलेल्या व फळधारणा झालेल्या स्थितीत निविदेव्दारे विक्रि करावयाची आहेत. विभाग निहाय गटांसाठी मोहोरबंद निविदा मंगळवार दिनांक ः २९.०३.२०२२ रोजी सकाळी १२.०० वाजेपर्यंत मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी या कार्यालयात स्विकारण्यात येतील. शक्य झाल्यास निविदा त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील. निविदेसाठी लागणारे कोरे निविदा फॉर्म, अटी/शर्ती सहीत निविदा प्रसारीत झालेल्या तारखेपासून दि.२९.०३.२०२२ पर्यंत रू.५००/- (रू.पाचशे मात्र) रोख भरून कार्यालयीन वेळेमध्ये शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ९ ते १२ व दुपारी २ ते ३ या वेळेत आणि दि. २९.०३.२०२२ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत मिळतील. निविदा प्रसिध्द झाल्यापासून लिलावासाठी असलेल्या आंबा फळबागा कार्यालयीन वेळेत संपर्क साधून प्रत्यक्ष पाहता येतील. तसेच निविदा भरताना इसारा रक्कम (**Earnest money**) म्हणून प्रत्येक गटासाठी रू.१०००० /- (रू.दहा हजार मात्र) **धनादेशाव्दारे** भरावयाचे आहेत. धनादेश **"डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठ"** या नांवे काढण्यात यावा.

निविदा भरण्यापुर्वी निविदाधारकाने बाजार समिती किंवा तत्सम व्यापारी परवाना आवश्यक असल्यास स्वतःच्या जबाबदारीने निविदा सादर करावयाची आहे.

सही/-

संचालक,

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,

ता. दापोली, जि. रत्नागिरी.